## नि.२५ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता आदेश २६, नियम ९ नुसार दावा मिळकतीची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी उपअधिक्षक भुमी अभिलेख, सावंतवाडी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करावी याकरीता दाखल केला आहे.

२) वादीच्या कथनानुसार, वादीने प्रस्तुतचा दावा, कायम ताकीद व प्रतिवादींनी दावा मिळकतीत केलेले अतिक्रमण व विना परवाना बांधकाम पाडून त्याचा खुला कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा मिळकतीस लागून प्रतिवादींच्या मालकीची स. नं. १२१ हि. नं. १० ही मिळकत असून प्रतिवादींनी दावा मिळकतीत अतिक्रमण करुन दगडाचे बांधकाम व लोखंडी शेडचे बांधकाम केले आहे. न्यायालयाच्या नि. ५ वरील आदेशानंतर प्रतिवादींनी त्यापैकी काही बांधकाम पाडून टाकले आहे व काही बांधकाम आजही दावा मिळकतीत आहे. त्यामुळे प्रतिवादींनी केलेले बांधकाम दावा मिळकतीत आहे अथवा कसे ही वस्तुस्थिती दावा मिळकत व प्रतिवादीच्या मालकीची स. नं. १२१ हि. नं. १० या दोन्ही मिळकतींची संयुक्त मोजणी केल्यानंतर स्पष्ट होणार आहे. त्यामुळे दावा मिळकत व स. नं. १२१ हि. नं. १० या दोन्ही मिळकतींची संयुक्त मोजणी करुन व हद्द निश्चित करुन प्रतिवादीने केलेले विवादीत बांधकाम कोणत्या मिळकतीत आहे हे दर्शवून तसा वस्तुस्थितीदर्शक नकाशा व अहवाल सादर करणेकरीता उपअधिक्षक, भुमी अभिलेख, सावंतवाडी यांनी कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करण्यात यावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

३) प्रतिवादी क्र.१ यांनी नि. ३५ वर आपले म्हणणे दाखल करुन उपअधिक्षक भुमी अभिलेख सावंतवाडी यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करण्यास संमती दिली आहे.

४) अभिलेखाचे अवलोकन केले व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५) वादीच्या कथनानुसार प्रतिवादींनी वादीच्या मालकीच्या दावा मिळकतीत बेकायदेशीर लोखंडी शेडचे बांधकाम केले आहे. वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे लगत कब्जेदार आहेत. प्रतिवादीने वादीच्या मिळकतीत अतिक्रमण केले आहे किंवा कसे तसेच केले असल्यास त्याचे मोजमाप अभिलेखावर येणे आवश्यक आहे जेणेकरुन खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येईल. प्रतिवादीने अर्जास हरकत घेतलेली नाही. करिता वादी यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) वादीचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२) उपअधिक्षक, भुमी अभिलेख, सावंतवाडी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करणेत येते.

३) न्यायालयीन आयुक्त यांना असे निर्देशित करणेत येते की, त्यांनी कमिशनपुर्व नोटीसा सर्व संबंधीतांना काढून गांव मौजे कारीवडे, ता. सावंतवाडी येथील दावा मिळकत स. नं. १२१ हि. नं. १० व ११ या दोन्ही मिळकतींची रितसर मोजणी करुन प्रतिवादीने वादीच्या दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे किंवा नाही, असल्यास सदर अतिक्रमित भागाचे मोजमापासह निश्चित क्षेत्र याचा सविस्तर अहवाल नकाशासह दोन महिन्याच्या आत न्यायालयात सादर करावा.

४) वादी यांनी न्यायालयीन आयुक्त यांची नियमानुसार फी उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, सावंतवाडी येथील कार्यालयात परस्पर जमा करावी.

५) वादीने न्यायालयीन आयुक्त यांचे शुल्क भरल्यानंतर कमिशनपत्र तात्काळ उपअधिक्षक, भुमी अभिलेख, सावंतवाडी यांचेकडे पाठविण्यात यावे

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.08.11 17:26:19 +0530

(जे. एम. मिस्त्री)

ठिकाण : सावंतवाडी
दिनांक ११/०८/२०२६

दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सावंतवाडी